महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग
मुख्य इमारत, अभिलेख कक्ष, रुम नं. २२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०००३२
ई मेल- tcacul२.mc-mh@mah.gov.in

मपुवि-२०२६/प्र.क्र. १३८/सां.का.२ दिनांक: १७ नोव्हेंबर, २०२६

प्रति,
आयुक्त,
इलेक्टॉनिक्स,माहिती व तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

विषय: इंट्रानेट वरील संदेश फलक येथे जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयांकित प्रकरणाच्या अनुषंगाने, पुराभिलेख संचालनालय, मुंबई या विभागात संचालक हे पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहे. सदर पदावर नियुक्तीस्तव इच्छुक अधिकाऱ्यांचे अर्ज मागविण्यासाठी इंट्रानेटवरील संदेश फलक येथे तसेच शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

सदर पदाबाबतची माहिती व विवरणपत्र प्रसिध्दीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

(भ.बा.आरेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे
प्रत: निवडनस्ती (सां.का.२)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग
मुख्य इमारत, अभिलेख कक्ष, रुम नं. २२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०००३२
ई मेल- tcacul२.mc-mh@mah.gov.in

मपुवि-२०२६/प्र.क्र.१३८ (ई.न.१९१६०२९) /सां.का.२ दिनांक: १७ नोव्हेंबर, २०२६

प्रति,
सह/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

विषय: पुराभिलेख संचालनालय, मुंबई या कार्यालयातील संचालक हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत

संदर्भ: १.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही- २०११/ प्र.क्र.१३७/ कार्यसन-१२ , दि.१७.१२.२०१६
२.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/ कार्यासन-१२ , दि. १६.०२.२०१८

महोदय / महोदया,

राज्य शासनाच्या विविध विभागात/ विभागाच्या अधिपत्याखालील मंडळे / महामंडळातील पदांवर संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्यांबाबतचे नवीन धोरणामध्ये सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये जाहीर तसेच सुधारणा केलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार, पुराभिलेख संचालनालय, मुंबई या कार्यालयात खालील पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहे :-

अ.क्र.	पदनाम	पदस्थापनेचे ठिकाण	वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार)	ज्या संवर्गातून पद भरावयाचे आहे त्या संवर्गाची नावे
१	२	३	४	५
१	संचालक	पुराभिलेख संचालनालय,मुंबई	S-२५: ७८८००-२०९२००	मंत्रालयीन विभागातील उप सचिव/सह सचिव/ महसूल संवर्गातील अपर जिल्हाधिकारी / S-२० किंवा त्यापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी मधील अधिकारी.

२. तरी, सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पदांवर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची नावे त्यांच्या मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालांसह, वैयक्तिक माहिती व ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र इ. माहिती संदर्भाधीन शासन निर्णय दि. १७.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्ताने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे याबाबतची माहिती सोबतच्या विहित करण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये या विभागाकडे (सां.का.२ कार्यासन) जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत ई-मेलद्वारे /प्रत्यक्षपणे निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने कृपया पाठवावीत. इच्छूक अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास त्यांना संबंधित विभाग विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे याबाबतही कृपया अभिप्राय द्यावेत. आपल्या विभागातून प्रतिनियुक्तीसाठी कोणीही अधिकारी इच्छूक नसल्यास, निरंक असेही कृपया कळविण्यात यावे. एकदा निवड झालेल्या अधिकाऱ्याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही. तसेच, सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर जाहिरात त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

आपला,

(भ.बा.आरेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे
प्रत: निवडनस्ती (सां.का.२)

विवरणपत्र

पुराभिलेख संचालनालय, मुंबई या विभागात संचालक हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यासंदर्भात इच्छूकता मागविण्यासाठी विहित करण्यात आलेला नमुना:

१	अधिकाऱ्यांचे संपूर्ण नाव	
२	पदनाम / संवर्ग पदाची वेतनश्रेणी	
३	सध्याच्या कार्यालयाचे नाव व पत्ता व दूरध्वनी क्रमांक	
४	जन्म दिनांक	
५	शैक्षणिक अर्हता	
६	भ्रमणध्वनी	
७	ज्या पदावर प्रतिनियुक्तीवर जाण्यास इच्छूक आहे ते पद	
८	मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत)	
९	संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे? तसेच, त्यांच्या विरुध्द भ्रष्टाचार / लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे.	
१०	संबंधित अधिकाऱ्याची निवड झाल्यास त्यास तात्काळ कार्यमुक्त करण्यास येईल किंवा कसे	
११	संबंधित अधिकारी कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १०% पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत किंवा कसे.	
१२	शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. १७.१२.२०१६, दि. २७.१२.२०१६ व दि.१६.०३.२०१८ मधील तरतूदीनुसा सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे.	